UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

वर्ष : ९१ • डिसेंबर २०२३ • पुरवणी विशेषांक १६

प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ,धुळे

Scanned with CamScanner

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

## पुरवणी अंक १६ – डिसेंबर २०२३ (त्रैमासिक)

● शके १९४५ ● वर्ष : ९१ ● पुरवणीअंक : १६

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

● प्रा.गणेश बेले ● प्रा.डॉ.प्रमोद अलोने ● प्रा.डॉ.किशोरचंद्र रेवतकर

❊ प्रकाशक ❊

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
ई–मेल : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

अंक मूल्य ₹ १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-; सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

Scanned with CamScanner

३६ मराठा आरक्षण : महाराष्ट्राच्या राजकारणातील एक समस्या - डॉ.विलास टाले, बुलढाणा ---- १५७

३७ कौटुंबिक हिंसाचार, प्रतिबंधक कायदे व उपाययोजना : एक समाजशास्त्रीय अध्ययन
- डॉ.उल्हास राठोड, कारंजा, जि.वर्धा ---------------------------------- १६२

३८ मराठा आरक्षण : एक चळवळ - डॉ.विनोद गायकवाड, शेगाव, जि. बुलढाणा ---------- १६६

३९ पर्यावरण समस्या आणि भारतीय राजकारण - डॉ.विनोद मुडे, वडनेर, ता.हिंगणघाट, जि.वर्धा. - १७०

४० डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषिविषयक विचार
- डॉ.विठ्ठल घिनमिने, वडनेर, ता.हिंगणघाट, जि.वर्धा ------------------------ १७५

४१ भारतातील ग्रामीण आर्थिक विकासामध्ये गौण वनउपजाचे महत्व
- १)प्रा.युवराज जांभुळकर, २)डॉ.एन.जी.उमाटे, भद्रावती, चंद्रपूर ----------------- १७९

४२ जळगाव जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास
- डॉ.विनोद नन्नवरे, जळगाव ---------------------------------------- १८३

४३ महिलांमधील अंधश्रद्धेचा कुटुंबावर होणारा प्रभाव
- १) प्रा.विरेनकुमार खोब्रागडे, २) डॉ. रणधीर साठे, चंद्रपूर. ------------------- १९०

४४ प्राचीन भारताच्या आर्थिक जिवनातील स्थित्यंतरे (इ.स. पुर्व सहावे शतक)
- डॉ.विशाल दौलतकर, राळेगाव ------------------------------------- १९४

४५ ग्रंथालयातील अभिलेखांचे शत्रू आणि उपाययोजना : एक चिकित्सक अध्ययन
- १)प्रा.विनायक नाकतोडे, २)डॉ.रमणिक लेनगुरे, नागपूर --------------------- १९८

४६ सहकार क्षेत्र आव्हाने आणि उपाय - डॉ.ताई उके, अंजनगाव सुरजी, जि.अमरावती. ------- २०३

४७ आधुनिक मराठी समीक्षासिद्धान्त - डॉ.विजय रैवतकर, आरमोरी ------------------ २०८

४८ आधुनिक समाजात महिलांचे योगदान : एक अवलोकन
- डॉ.विठ्ठल चव्हाण, देसाईगंज, जि.गडचिरोली. --------------------------- २१२

४९ सद्यस्थितीत महात्मा गांधीच्या स्त्री विषयक विचारांची प्रासंगिकता
- डॉ.विठोबा चंदनखेडे, समुद्रपूर, जि.वर्धा. ------------------------------- २१६

५० भारतीय राज्यव्यवस्थेत महिलांचे प्रतिनिधीत्व : एक वास्तव
- डॉ.विजया राऊत, मोहाडी, जि.भंडारा --------------------------------- २२०

५१ भारतातील बेरोजगारीच्या समस्यांचे विश्लेषण व उपाय
- डॉ.गजानन सोमकुंवर, खापरखेडा, जि.नागपूर --------------------------- २२६

५२ विवेकानंदांचे भारतदेशा बाबत विचार - डॉ.प्रविण करंजकर, वडनेर, जि.वर्धा ---------- २३०



Scanned with CamScanner

ISSN No 2394-5990

# जळगाव जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास

डॉ. विनोद आत्माराम नन्नवरे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव.

**सारांश :**

लोकसंख्येच्या संदर्भात जगात भारताचा दुसरा क्रमांक लागतो या लोकसंख्येच्या ६४ टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागातच राहत आहे आणि तेथेच आपला उदरनिर्वाह करते तसेच जळगाव जिल्हा हा महाराष्ट्रातील एक प्रमुख जिल्हा म्हणून ओळखला जातो कारण या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सर्वच सुविधा या दिसून येतात. आज भारतात शेतीत दुसऱ्या हरितक्रांतीची आवश्यकता आहे. जेणे करून देशातील कृषी उत्पादन, कृषी क्षेत्राला विविध तंत्रज्ञानाची गरज पूर्ण होईल. परंतु आजही शेतकरी हरितक्रांती अभावी पारंपारिक पद्धतीने शेती करतो. परिणामी तो आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे. त्यामुळे सदर संशोधनात अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करत आहोत.

**बीज शब्द / मुख्य शब्द -**

कृषीक्षेत्र, अल्पभूधारक, शेतकरी, आर्थिक, उत्पन्न, उत्पादन, रोजगार, कर्ज.

**प्रस्तावना :**

जगात ज्या काही निर्माण समस्या निर्माण झालेल्या आहेत त्यातून अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्याचे काम जगात कृषिक्षेत्रानेच केलेले आहे भारत हा देखील कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो भारतात अनेक राज्य आहेत तसेच भारतात लोकसंख्या देखील मोठ्या प्रमाणात आढळते आणि लोकसंख्येच्या संदर्भात जगात भारताचा दुसरा क्रमांक लागतो या लोकसंख्येच्या ६४ टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागातच राहत आहे आणि तेथेच आपला उदरनिर्वाह करते तसेच जळगाव जिल्हा हा महाराष्ट्रातील एक प्रमुख जिल्हा म्हणून ओळखला जातो कारण या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सर्वच सुविधा या दिसून येतात जसे की रेल्वे मार्ग रस्ते मार्ग हवाई मार्ग सर्वच बाबतीत जळगाव जिल्हा अग्रेसर आहे. जळगाव जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्राचा देखील विकास झालेला आहे आणि असे असले तरी औद्योगिक क्षेत्र मोठ्या प्रमाणात आढळून येत असले तरी देखील जळगाव जिल्ह्यातील बहुतांश लोकसंख्या कृषी वरच अवलंबून आहे. तसेच जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे असणारे प्रमाण देखील जास्त आहे. शेतकऱ्यामुळेच देशाचा आर्थिक विकास होऊ शकतो हे जरी कटू सत्य असले तरी शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा व शेतकऱ्याने देशाच्या आर्थिक विकासात शेतकऱ्यांचे योगदान काय याचा मात्र विचार कुठेही केला जात नाही. कारण देशाचा आर्थिक विकास हा खऱ्या अर्थाने शेतकऱ्याने केलेल्या श्रमावरच होऊ शकतो. शेतकऱ्याने केलेल्या शेतीमधूनच होऊ शकतो परंतु दुर्दैवाने भारतात त्याकडे लक्ष दिले जात नाही. आज भारतात शेतीत दुसऱ्या हरितक्रांतीची आवश्यकता आहे. जेणे करून देशातील कृषी उत्पादन, कृषी क्षेत्राला विविध तंत्रज्ञानाची गरज पूर्ण होईल. परंतु आजही शेतकरी हरितक्रांती अभावी पारंपारिक पद्धतीने शेती करतो. परिणामी तो आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे. याचा विचार कोणतेही सरकार करत नाही. खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्माता जर कोणी असेल तर तो ग्रामीण भागातील शेतकरीच आहे आणि त्यामुळे सदर संशोधनात अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास केलेला आहे.

जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांची माहिती :-

सन २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१०५६९५७३ महाराष्ट्राची एकुण लोकसंख्या ११२३७४३३३ जळगाव जिल्ह्याची ४२२९९१७ इतकी आहे. यात पुरुष संख्या २१९७३६५ तर महिला संख्या २०३२५५२ त्यापैकी जळगाव जिल्हातील २८८७२०६ लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. ज्यात पुरुष संख्या १५००५१४ इतकी तर महिला संख्या १३८६६९२ इतकी आहे. जळगाव जिल्ह्यात १५ तालुके असून १५३३ इतक्या गावांची संख्या आहे. जळगाव जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ ११७६५०२ इतके आहे. जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एकुण लोकसंख्ये पैकी ३७००३८ इतके शेतकरी असून त्यापैकी पुरुष शेतकरी संख्या २४२०५१तर महिला शेतकरी संख्या १२७९८७ इतकी आहे. तर जळगाव जिल्ह्यात सिमान्तिक काम करणारे शेतकरी संख्या २५५७३ असुन जळगाव तालुक्यात सिमान्तिक शेतकरी संख्या १५२३ आहे.

**उद्दिष्ट्ये :-**

१. जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांची माहिती मिळवणे.

२. जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

**गृहितके :-**

१. जळगाव जिल्ह्यात शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे.

२. जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा आर्थिक स्थिती मागासलेली आहे.

**संशोधन पद्धती :**

**प्राथमिक स्त्रोत :**

संशोधनात वस्तुनिष्ठता यावी याकरिता सदर संशोधनात आवश्यक पुरक ठरेल अशी माहिती मिळविण्याकरिता संशोधकाने प्राथमिक स्वरूपातील आवश्यक असणारे अनुसूची, मुलाखत अनुसूची, मुलाखत, व निरीक्षण या साधनांचा आधार घेऊन माहिती मिळविलेली आहे.

**दुय्यम स्रोत :-**

सदर संशोधनात दुय्यम स्त्रोताचा समावेश संशोधनासाठी केला आहे. त्यातप्रामुख्याने प्रकाशित व अप्रकाशित अशा सर्व माहितीच्या साधनांचा समावेश केलाअसून प्रामुख्याने विविध विद्यापीठातील विषयांची पी.एच.डी.प्रबंध वेगवेगळ्या प्रकाशनाने प्रकाशित केलेले संदर्भग्रंथ, शासकीय व खाजगी संस्थांनी तयार केलेले अहवाल, शासकिय गेझेटिअर, विविध त्रैमासिके, मासिके यातील संशोधनपर पेपर, वर्तमानपत्रे, विश्वकोश तसेच भारत सरकारच्या महाराष्ट्र व सरकारच्या विविध संकेतस्थळांचा वापर केला आहे.

**अ) नमुना निवड :-**

**तक्ता क्र. 1**

| अ.क्र. | जिल्हा जळगाव | तालुका | निवडलेल्या तालुक्यांतील गावांचीसंख्या | शेतकरी संख्या | एकूण गावे |
|---|---|---|---|---|---|
| 1. | जळगाव | 15 | 15 | 50 | 1533 |

स्त्रोत:- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे

**तक्ता क्र. 2**

**कच्च्या माल विषयक**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | होय | 40 | 80 % |
| 2. | नाही | 07 | 14 % |
| 3. | निश्चित सांगता येत नाही | 03 | 06 % |
| एकुण | | 50 | 100.0 % |

आधार : 50 ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून प्राप्त माहिती (प्रश्नावली )

वरील माहितीवरुन असे लक्षात आले कि, जळगाव जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्र हे शेतीतून येणाऱ्या कच्च्या मालावरच आधारित आहे. असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ८० टक्के, नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण १४% इतके दिसून आले तर निश्चितच काही सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ६ टक्के इतके दिसून आले.

यावरून असे लक्षात येते की जळगाव जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्र खऱ्या अर्थाने जिल्ह्यातील कृषी क्षेत्रावरच अवलंबून आहे आणि त्यामुळेच जिल्ह्याचा औद्योगिक विकास होत आहे.



Scanned with CamScanner

### तक्ता क्र. 3

### कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमते बाबत

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | होय | 39 | 78 % |
| 2. | नाही | 06 | 12 % |
| 3. | निश्चित सांगता येत नाही | 05 | 10 % |
| एकुण | | 50 | 100.0 % |

आधार : 50ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून प्राप्त माहिती (प्रश्नावली)

वरील तक्त्यात सदर प्रश्न उपस्थित केला व त्यासाठी तीन वेगवेगळे पर्याय उपलब्ध करून दिले त्यातून असे लक्षात आले की भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र हे आर्थिक मंदीतून बाहेर काढण्यास महत्त्वाची भूमिका बजावते असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ७८ टक्के, नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण १२ टक्के, तर निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण १० टक्के इतके आहे.

### तक्ता क्र. 4

### कृषी रोजगार देणारे क्षेत्र

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | होय | 34 | 68 % |
| 2. | नाही | 15 | 30 % |
| 3. | निश्चित सांगता येत नाही | 01 | 02 % |
| एकुण | | 50 | 100.0 % |

आधार : 50 ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून प्राप्त माहिती (प्रश्नावली )

वरील तक्त्यात जळगाव जिल्ह्यातील कृषी आजही सर्वाधिक रोजगार देते असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ६८ टक्के, नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ३०% इतके आहे. तर निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण २ टक्के इतके आहे.

### तक्ता क्र. 5

### उत्पादन वाढी बाबत

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | जोड व्यवसाय | 14 | 28 % |
| 2. | रासायनिक खते | 07 | 14 % |
| 3. | आधुनिक तंत्रज्ञान | 14 | 28 % |
| 4. | नोकरी | 01 | 02 % |
| 5. | शेतमजूर | 01 | 02 % |
| 6. | वरील सर्व | 13 | 26 % |
| एकुण | | 50 | 100.0 % |

आधार : 50 ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून प्राप्त माहिती (प्रश्नावली)



Scanned with CamScanner

वरील तक्त्यात जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषी उत्पादन वाढीसाठी शेतीबरोबरच जोड व्यवसाय करावा असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण २८ टक्के रासायनिक खतांचा वापर करावा असे मत १४ टक्के, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा असे मत २८ टक्के, तसेच शेती करीत असताना कुटुंबातील व्यक्ती नोकरीला असेल तर शेतीत सुधारणा करता येतात असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ०२ टक्के आहे, जो शेतकरी शेती करतो त्याच कुटुंबातील व्यक्ती शेतमजूर असेल तर तो उत्पादन बऱ्यापैकी घेऊ शकतो असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ०२ टक्के इतके आहे तर वरील सर्व सुविधा असल्यास शेतकरी अजून चांगल्या पद्धतीने उत्पादन होऊ शकतो असे मत व्यक्त करणारे प्रमाण २६ टक्के इतके आहे.

**तक्ता क्र. 6**

**शेतीतील वार्षिक उत्पन्न**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | 10000 ते 50000 | 35 | 70 % |
| 2. | 51000 ते 75000 | 06 | 12 % |
| 3. | 76000 ते 100000 | 07 | 14 % |
| 4. | 100000 ते 150000 | 01 | 02 % |
| 5. | 151000 पेक्षा जास्त | 01 | 02 % |
| एकुण | | 50 | 100.0 % |

आधार : 50 ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून प्राप्त माहिती (प्रश्नावली)

वरील तक्त्यात असे दिसून आले की, जळगाव जिल्ह्यातील व्यक्तींचे सर्वसामान्य उत्पन्न वार्षिक उत्पन्नाची चार गटात विभागणी केली असता असे दिसून आले की, १०००० ते ५०००० या उत्पन्न गटात ७० टक्के कुटुंबियांचा समावेश होत असून ५१००० ते ७५००० या उत्पन्न गटात १२ टक्के कुटुंबियांचा, ७६००० ते१५०००० या उत्पन्न गटात १४ टक्के, १००००० ते १५००००जास्त उत्पन्न असणाऱ्या शेतकरी कुटुंबियांची संख्या टक्के इतकी तर १५१००० पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबियांची संख्या २ टक्के दिसून आली.

**तक्ता क्र. 7**

**शेती कर्ज कालावधी**

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | होय | 24 | 48 % |
| 2. | नाही | 15 | 30 % |
| 3. | निश्चित सांगता येत नाही | 11 | 22 % |
| एकुण | | 50 | 100.0 % |



Scanned with CamScanner

ISSN No. 2394-5990

वरील तक्त्यात शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी आवश्यक असणारे कर्ज कमीत कमी कालावधीत मिळावे असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ४८ टक्के असुन नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ३० टक्के आहे तर निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण २२ टक्के असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. 8

शेतकऱ्यांना दिले जाणारे कर्ज अल्प व्याज दर

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 20 | 40 % |
| 2 | नाही | 19 | 38 % |
| 3. | निश्चित सांगता येत नाही | 11 | 22 % |
| एकुण | | 50 | 100.0 % |

आधार : 50 ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून प्राप्त माहिती (प्रश्नावली)

वरील तक्त्यात शेतकऱ्यांना दिले जाणारे कर्ज अल्पव्याजी असावे असे मत व्यक्त करणारे ४० टक्के आढळून आलेअसून नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ३८ टक्के आहे तर निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण २२ टक्के इतके आहे.

तक्ता क्र. 9

जिल्ह्यातील विविध व्यवसायांचे केंद्रीकरण

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 26 | 52 % |
| 2 | नाही | 12 | 24 % |
| 3 | कोणतेही बदल नाहीत | 12 | 24 % |
| एकुण | | 50 | 100.0 % |

आधार : 50 ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून प्राप्त माहिती (प्रश्नावली)

वरील तक्त्यात जिल्ह्यातील कृषी उत्पादनामुळे विविध व्यवसायांचे जिल्ह्यात केंद्रीकरण झालेले आहे का याची माहिती मिळवण्यासाठी सदर प्रश्न उपस्थित केलेला व त्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध करून दिलेले आहेत माहिती मिळवली असता असे दिसून आले कि, जिल्ह्यात कृषी उत्पादनामुळे केंद्रीकरण झालेले आहे असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ५२ टक्के इतके आहे असून नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण २४टक्के इतके आहे तर कोणते बदल झालेले नाहीत असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण २४ टक्के इतके आहे.

तक्ता क्र. 10

दरडोई उत्पन्नात वाढ

| अ.क्र. | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 30 | 60 % |
| 2 | नाही | 09 | 18 % |
| 3 | कोणतेही बदल नाहीत | 11 | 24 % |
| एकुण | | 50 | 100.0 % |

आधार : 50 ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून प्राप्त माहिती (प्रश्नावली)



Scanned with CamScanner

वरील तक्त्यात कृषी व्यवसायाच्या भरभराटीमुळे जिल्ह्यातील रोजगारात वाढू होऊन दरडोई उत्पन्नात वाढ झालेली आहे असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ६० टक्के इतके असून दरडोई उत्पन्नात वाढ झालेली नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण १८ टक्के इतके आहे. तर कोणतेही बदल झालेले नाहीत असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण २४% इतके आहे.

**गृहीतकृत्याची सिद्धता :**

संशोधन करण्यासाठी काही गृहीतके यापूर्वी ठरवलेली होती. त्यानुसार संशोधनाच्या अंतिम टप्प्यात मात्र या गृहीतकांची पडताळणी हि संशोधकाला करावी लागते. संशोधकाने संशोधनात जळगाव जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास या विषया अंतर्गत आपल्या संशोधनास सुरुवात केली. त्यासाठी काही उद्दीष्ट्ये व गृहीतकृत्य मांडली होती. याची पडताळणी संशोधकाने पुढील प्रमाणे केली आहे.

**१. जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांची माहिती मिळवणे.**

वरील तक्ता क्र. २ वरील माहिती वरून असे सिध्द होते की, जळगाव जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्र हे शेतीतून येणाऱ्या कच्च्या मालावरच आधारित आहे. असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ८० टक्के, नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण १४% इतके दिसून आले तर निश्चितच काही सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ६ टक्के इतके दिसून आले.

तक्ता क्र. ४ वरील माहिती वरून असे सिध्द होते की, संशोधिकेने जळगाव जिल्ह्यातील कृषी आजही सर्वाधिक रोजगार देते असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ६८ टक्के, नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ३०% इतके आहे. तर निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण २ टक्के इतके आहे.

**२. जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.**

वरील तक्ता क्र. ६ वरील माहिती वरून असे सिद्ध होते की, जळगाव जिल्ह्यातील व्यक्तिंचे सर्वसामान्य उत्पन्न वार्षिक उत्पन्नाची चार गटात विभागणी केली असता असे दिसून आले की, १०००० ते ५०००० या उत्पन्न गटात ७० टक्के कुटुंबियांचा समावेश होत असून ५१००० ते ७५००० या उत्पन्न गटात १२ टक्के कुटुंबियांचा, ७६००० ते१५०००० या उत्पन्न गटात १४ टक्के, १००००० ते १५००००जास्त उत्पन्न असणाऱ्या शेतकरी कुटुंबियांची संख्या टक्के ईतकी तर १५१००० पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबियांची संख्या २ टक्के दिसून आली.

वरील तक्ता क्र. १० वरील माहिती वरून असे सिध्द होते की, वरील तक्त्यात कृषी व्यवसायाच्या भरभराटीमुळे जिल्ह्यातील रोजगारात वाढू होऊन दरडोई उत्पन्नात वाढ झालेली आहे असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण ६० टक्के इतके असून दरडोई उत्पन्नात वाढ झालेली नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण १८ टक्के इतके आहे. तर कोणतेही बदल झालेले नाहीत असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण २४% इतके आहे.

**निष्कर्ष :**

१. ७०% जळगाव जिल्ह्यातील व्यक्तींनी सागितले कि आमचे वार्षिक उत्पन्न १०००० ते ५०००० इतके आहे.
२. ८० टक्के जळगाव जिल्ह्यातील व्यक्तीने सांगितले की भारतातील औद्योगिक क्षेत्र हे कृषी मालावर आधारित आहे असे मत व्यक्त केले.
३. ७८ टक्के व्यक्तीने मत व्यक्त केले की आर्थिक मंदीतून बाहेर काढण्याची क्षमता कृषी अर्थव्यवस्थेत आहे.
४. ६८% भारतीय व्यक्ती सर्वाधिक रोजगार देणारे क्षेत्र म्हणून कृषी कडेच पाहतात.
५. २८% शेतकऱ्यांनी आपले उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानासोबत जोड व्यवसाय करणे गरजेचे आहे.
६. ४८% व्यक्तींनीं सांगितले की शेती करण्यासाठी आवश्यक कर्ज कमीत कमी कालावधीत शेतकऱ्यास मिळाले पाहिजे.
७. ४०% व्यक्तींनी सांगितले की शेतकऱ्यांना दिले जाणारे कर्ज अल्प व्याजदर असावे.
८. ५२% व्यक्ती असे मत व्यक्त करतात की कृषी उत्पादनामुळे विविध व्यवसायांचे केंद्रीकरण झालेले आहे.

**संदर्भ सूची :**

१. कै.डॉ.देसाई स.श्री.मु.डॉ.सौ.भालेराव निर्मल, भारतीय अर्थव्यवस्था, जून २००९, निराली प्रकाशन, पुणे.
२. Population census Abstract - 2011
३. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२१ - जळगाव.



Scanned with CamScanner

ISSN No 2394-5990

४. डॉ. पाटील वा.भा. २००६ संशोधन पद्धती, प्रकाशक व मुद्रक - प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
५. डॉ.कन्हाडे बी.एम, जुलै २००, संशोधन पद्धती, प्रकाशक पिंपळापुरे एन्ड कंपनी पब्लीशर्स, नागपूर.
६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२१ - जळगाव.
७. स्त्रोत:- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे.
८. Number - 3 July-Sept . 2017.
९. https://mahades.maharashtra.gov.in/
१०. कृषीगणना अहवाल.



Scanned with CamScanner